# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.01.2025** **वारःशुक्रवार**

---

1. अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज राष्ट्रपतींच्या उपस्थितीत समारोप
2. भारत मंडपम इथे आजपासून तीन दिवसीय 'युवा नेतृत्व संवाद 2025'ला प्रारंभ
3. महाकुंभ मेळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आकाशवाणीच्या 'कुंभवाणी' वाहिनीचं आज लोकार्पण
4. भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघादरम्यानच्या मर्यादित षटकांच्या सामना मालिकेला आजपासून सुरुवात आणि
5. उत्तर भारतात थंडीची लाट कायम, दाट धुक्यामुळे वाहतूक विस्कळीत.

**राष्ट्रपति-प्रवासी दिवस**

राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांचं काल ओदीशाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी भुवनेश्वर इथे आगमन झालं. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आज अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा समारोप होणार आहे. या संमेलनाला 75 देशांतील सुमारे 6 हजार अनिवासी भारतीय सहभागी झाले आहेत. भारतीय जनसमुदायातील 17 सदस्यांना, त्यांनी विविध क्षेत्रात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, राष्ट्रपतींच्या हस्ते, 'प्रवासी भारतीय सन्माना'ने पुरस्कृत करण्यात येणार आहे.

दरम्यान, काल भुवनेश्वर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या अठराव्या 'प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आलं. जगभरात राहणाऱ्या भारतीय समुदायाच्या उत्तम कामगिरीचा देशाला अभिमान आहे असे गौरवोद्गार पंतप्रधानांनी याप्रसंगी बोलताना काढले. तसंच, विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यामध्ये जगभरातल्या भारतीय समुदायाचं महत्त्वपूर्ण योगदान असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. यावेळी, मोदी यांनी 'प्रवासी भारतीय एक्स्प्रेस'ला यांनी दूरस्थ माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला. केंद्रीय मंत्री डॉ एस जयशंकर, अश्विनी वैष्णव, यांच्यासह अनेक मान्यवर आणि विविध देशांमध्ये राहणारे प्रवासी भारतीय यांनी या संमेलनाला हजेरी लावली आहे.

**राजनाथसिंह**

पुढील महिन्यात बेंगळुरू इथे होणाऱ्या 'एरो इंडिया 2025' या आशियातील सर्वात भव्य हवाई प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत, राजदूतांच्या गोलमेज बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीला, भारताचे मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या 150 हून अधिक देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त सहभागी होण्याची अपेक्षा आहे, असं संरक्षण मंत्रालयाने म्हंटलं आहे. 10 ते 14 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या हवाई प्रदर्शनाची मध्यवर्ती संकल्पना 'लक्षावधी संधींसाठीचा राजमार्ग' अर्थात 'रनवे टू बिलियन अपॉर्च्युनिटीज' अशी आहे. या हवाई प्रदर्शनाच्या माध्यमातून, स्वदेशीकरणाला गती मिळेल तसंच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या भागीदारीसाठी परदेशी आणि भारतीय कंपन्यांना एक मोठं व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

**युवानेता संवाद**

नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे आजपासून तीन दिवसीय 'विकसित भारत युवा नेतृत्व संवाद 2025' ला सुरुवात होत आहे. विकसित भारताच्या निर्माणाकरिता, तरुणांना नावीन्यपूर्ण संकल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळवून द्यावं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. देशभरातील सुमारे 30 लाख युवक युवतींनी यात सहभाग नोंदवला असून आजच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी एकंदर तीन हजार युवक युवतींची निवड करण्यात आली आहे. विकसित भारताशी निगडीत विषयांवरील सादरीकरणं आणि स्पर्धांमध्ये हे युवा सहभागी होतील.

**राष्ट्रीय युवा संसद**

नवी दिल्लीत केंद्रीय विद्यालयांच्या 34 व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धा 2023-24 ची पारितोषिकं आज केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील. देशभरातील 150 केंद्रीय विद्यालयं या स्पर्धेत सहभागी झाली होती.

**कुंभवाणी**

उत्तर प्रदेशात होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आकाशवाणीच्या 'कुंभवाणी' वाहिनीचं लोकार्पण आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते प्रयागराज इथे होणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री डॉक्टर एल. मुरूगन या कार्यक्रमाला दूरस्थ पद्धतीने उपस्थित राहणार आहेत. याच कार्यक्रमात आदित्यनाथ यांच्या हस्ते 'कुंभमंगल धुन'चं देखील उद्घाटन होणार आहे. या आकाशवाणी वाहिनीवरून, आजपासून 26 फेब्रुवारी पर्यन्त महाकुंभमध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमावर आधारित अनेक कार्यक्रम प्रसारित करण्यात येतील. सकाळी 5 वाजून 55 मिनिटांपासून रात्री 10 वाजून 5 मिनिटांपर्यंत, या वाहिनीचं प्रसारण सुरू राहील. ही एफ एम वाहिनी 103 पूर्णांक 5 मेगा हर्टझवर, न्यूज ऑन ए आय आर या ॲप तसंच वेव्हज ओ टी टी वर ऐकता येईल.

**अमेरिका-वणवा**

अमेरिकेतील लॉस एंजलीस शहरासह आजूबाजूच्या प्रदेशांत वेगाने वणवा पसरत असून, हॉलीवूड सह अनेक प्रदेशात धोका निर्माण झाला आहे. या वणव्यामुळे आतापर्यंत पाच जणांचा मृत्यू झाला असून मृतांची अधिकृत आकडेवारी अद्याप स्पष्ट झालेली नाही. लॉस एंजलीस काऊंटी मधील सुमारे 1 लाख 80 हजार रहिवाशांना स्थलांतर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या वणव्यामुळे लागलेल्या आगीत हॉलीवूड मधील अनेक चित्रपट कलाकार आणि मान्यवरांना घरे गमवावी लागली आहेत. या वणव्यात आतापर्यंत अंदाजे 17 हजार एकरपेक्षा अधिक जमिनीला आगीची झळ बसली असून, या विनाशकारी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दल शर्तीचे प्रयत्न करत आहे.

**लेबेनॉन-राष्ट्रपती**

लेबनॉनच्या संसदेने लष्करप्रमुख जोसेफ आऊन यांची देशाचे नवे राष्ट्रपती म्हणून निवड केली आहे. आऊन यांनी काल बैरूत इथे संसद भवनात पदभार स्वीकारून देशातील जनतेला संबोधित केलं.

**दिल्ली विधानसभा**

दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी होणार आहे. अधिसूचना जारी झाल्यानंतर आजपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होईल. 17 जानेवारीपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येतील. तर 20 जानेवारी पर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी, भाजप आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

**लष्कर दिन**

भारतीय लष्कराच्या 77व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्याच्या बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होणाऱ्या संचलनात लष्करातील महिला शक्तीचं दर्शन होणार आहे. सध्या या संचलनाचा सराव सुरू आहे. ऐकुया या विषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून...

**पुण्यात पहिल्यांदाच होत असलेल्या लष्कर दिनाच्या संचलनात भारतीय लष्कराचं सामर्थ्य दर्शवणारी अत्याधुनिक शस्त्र सामग्री तसंच भारतीय नागरिकांशी असलेलं दृढ नातं दर्शवणारं आहे. या संचलनात पहिल्यांदाच नेपाळ लष्करी बँड चा समावेश करण्यात आला आहे. त्याचबरोबर लष्कर पोलिसांच महिला अग्निविर दल, राष्ट्रीय छात्र सेना अर्थात एनसीसीच्या महिला दलाचा समावेश आहे. या दोन महिला दलांचा संचलनात सहभाग हि अभिमानाची बाब आहे. त्याचबरोबर बेळगावच्या मराठा रेजिमेंट दल, नाशिकच्या तोफखाना दल, नाशिक अहिल्यानगर आणि सिकंदराबादच्या तोफखाना केंद्राचं दल, लष्कराचं घोड दलाचा यामध्ये सहभाग आहे. भारतीय लष्करातील टी 90 रणगाडा, वज्र यंत्रणा, साराथ चिलखती वाहन यांचाही सहभाग आहे. भारतीय लष्करातील अद्ययावत उपकरणं लष्कराची आत्मनिर्भरता दर्शवतात. तसंच लष्कराची ऑलिम्पिक मोहीम, विकसित भारत 2047 मोहीम, देशाच्या उभारणीत माजी सैनिकांचा सहभाग, हवामान बदल आणि प्रदूषण मुक्ती साठी लष्कराचे प्रयत्न हे दर्शवणारे चित्र रथ हि संचलनाच आकार्षण असणार आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी, श्रद्धा वार्डे, पुणे**

**महिला बाल विकास**

केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी आज राजस्थानमधल्या उदयपूर इथं आयोजित तीन दिवसीय चिंतन शिबीराचं उद्घाटन करणार आहेत. सरकारच्या विविध योजनांसह महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या प्रमुख उपक्रमांचा आढावाही या चिंतन शिबिरात घेण्यात येणार आहे. देशातील सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचे महिला आणि बालविकास मंत्री या शिबिरात सहभागी होणार आहेत.

**चिदंबरम**

केंद्रीय अन्वेषण ब्युरो अर्थात सीबीआयनं भ्रष्टाचाराच्या कथित प्रकरणात काँग्रेस खासदार कार्ती चिदंबरम यांच्याविरुद्ध नवीन प्राथमिक तपासणी अहवाल दाखल केला आहे. हे प्रकरण कार्ती चिदंबरम आणि त्यांच्या एका जवळच्या सहाय्यकाच्या नियंत्रणाखाली असलेल्या एका कंपनीवर मद्यविक्रीसाठी घातलेली बंदी उठवण्याच्या कथित अनियमिततेशी संबंधित आहे.

**पुरस्कार**

पुण्यातील गिरीप्रेमी संस्थेचे ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना 2023 चा, मानाचा तेनजिंग नॉर्गे राष्ट्रीय साहस जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 17 जानेवारीला दिल्लीमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. साहसी क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

**महिला क्रिकेट**

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघादरम्यान खेळल्या जाणाऱ्या मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या श्रृंखलेतील पहिला सामना आज गुजरात मधील राजकोट इथे खेळला जाणार आहे. सकाळी 11 वाजता सामन्याला सुरुवात होईल. कर्णधार हरमनप्रीत कौर हिच्या अनुपस्थित, भारतीय संघाचं नेतृत्व स्मृति मंधना करणार असून, गेबी लुईस आयर्लंड संघाची कर्णधार आहे.

**थंडीलाट**

उत्तर भारतात बहुतांश ठिकाणी थंडीची लाट अधिकच तीव्र झाली आहे. जम्मू-काश्मीर, लदाख, हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश आदि भागात पुढील दोन दिवस थंडीची लाट कायम राहील, तर, पंजाब, हरयाणा, चंदीगड, दिल्ली आणि उत्तर प्रदेशमध्ये दाट धुकं राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. दाट धुक्याचा परिणाम वाहतुकीवर झाला असून, संपूर्ण उत्तर भारतात रेल्वे आणि विमानसेवा विस्कळीत झाली आहे. दिल्लीकडे जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या उशिराने धावत आहेत. दरम्यान, राजस्थान मधील बिकानेर, जयपूर, भरतपुर आणि अजमेरच्या काही भागांत आज आणि उद्या हलक्या ते माध्यम पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.